दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

मुंबई || वर्ष २ रे || अंक २३४ || शुक्रवार ०९ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## आता, झाड तोडाल तर ५० हजार दंड, वन विभागाचा निघणार; मंत्रिमंडळ बैठकीत १२ मोठे निर्णय

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ (सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.त्यामध्ये, १२ विविध निर्णय घेण्यात आले असून जलसंपदा विभाग, शेतकरी, आदिवासी आणि वन विभागासाठी () महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार, यापुढे झाड तोडल्यास ५० हजार रुपयांच दंड आकारण्यात येणार आहे. यापूर्वी १ हजार रुपयांचा दंड आकारला जात होता. त्यामुळे, यापुढे झाडांची कत्तल करताना किंवा झाडे तोडताना होणाऱ्या परिणामाचा विचार करुनच पाऊल उचलायला हवं. विना परवानगी जंगल तोडणाऱ्यांसाठी वन विभागाच हे मोठ पाऊल उचललं आहे.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, वन विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून एक झाड तोडल्यास ५० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. या दंडाची तरतूद करणार शासन निर्णय लवकरच पारीत होईल. तसेच, पुढील आठवड्यात १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्य दिवस असल्याने हर घर तिरंगा मोहिम राबविण्यात येणार आहे. त्यासाठीही, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला आहे. ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबवविणार येणार असून अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविण्यात येईल.




आजच्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

१. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन. महत्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता. पावणे चार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार (जलसंपदा विभाग)२. आता प्रकल्पबाधितांना सदनिका मिळणार, धोरणास मान्यता( गृहनिर्माण विभाग)

३. लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग येणार, कर्ज उभारण्यास मान्यता

( नगरविकास विभाग)

४. आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ.

(आदिवासी विकास विभाग)

५. अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्य अडचणी दूर होणार

अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय( आदिवासी विकास विभाग) ६. विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार दंड (वन विभाग)७. महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण राबविणार. पाच वर्षात तीस हजार कोटींचे उत्पन्न मिळणार(उद्योग विभाग) ८. कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय, आजरा तालुक्यात योग व निसर्गोपचार महाविद्यालय

(वैद्यकीय शिक्षण)

९. न्यायमूर्ती, मुख्य न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घरकामगार, वाहनचालक सेवा

(विधी व न्याय विभाग)

१०. सेना कल्याण शैक्षणिक संस्था आणि राधा कल्याणदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टला मुद्रांक शुल्कात १०० टक्के सूट

(महसूल विभाग)


११. जुन्नरच्या श्री.कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक सहकारी संस्थेस अर्थसहाय

(सहकार विभाग)

१२. ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविणारअडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविणार. विविध कार्यक्रमांचे आयोजन (सांस्कृतिक कार्य विभाग)

## मृत आरोपीला २० वर्षांनंतर अटक

हैदराबाद,स्थानिक न्यायालयाने मृत घोषित केलेल्या आणि बँक फसवणूक प्रकरणात २० वर्षांपासून फरार घोषित करण्यात आलेल्या आरोपीला सीबीआयने अटक केली.आरोपी व्ही. चलपती राव याने अटक टाळण्यासाठी वारंवार आपली ओळख आणि ठिकाण बदलले, असे सीबीआयने प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे. मे २००२ मध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे बँकेची ५० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी तो



हैदराबाद येथील स्टेट बँकेच्या चंदुलाल बिरादरी शाखेत संगणक परिचालक म्हणून कार्यरत होता. सीबीआयने ३१ डिसेंबर २००४ रोजी दोन आरोपपत्र दाखल केले होते. तो २००४ पासून बेपत्ता होता.त्याची पत्नीही फसवणूक प्रकरणात आरोपी आहे. राव कथितपणे बेपत्ता झाल्याच्या सात वर्षांनंतर तिने चलपतीला मृत करण्यासाठी दिवाणी न्यायालयात धाव घेतली होती. यानंतर न्यायालयाने त्याला मृत घोषित करण्याचा आदेश दिला होता. आरोपी आपले लोकेशन, मोबाईल नंबर आणि ओळख वारंवार बदलत होता. मात्र, सीबीआयने त्याचा पाठलाग सुरूच ठेवला आणि अखेर तामिळनाडूतील एका गावातून त्याला पकडण्यात आले.

: सीबीआयने गोळा केलेल्या माहितीनुसार, आरोपी सालेम येथे पळून गेला होता. एम. विनीत कुमार असे भासवून त्याने २००७ मध्ये एका महिलेशी लग्न केले आणि आधार क्रमांकही मिळवला होता. त्याने अनेक ठिकाणे बदलवत भोपाळ, उत्तराखंड, औरंगाबादचे वेरूळ, त्यानंतर राजस्थान आणि तिरुनेलवेली येथे गेला. या काळात त्याने सुमारे १० वेळा मोबाईल नंबर बदलला आणि सागरी मार्गाने श्रीलंकेला पळून जाण्याची योजना आखली. शेवटी ऑगस्ट रोजी तिरुनेलवेली येथील नरसिंगनाल्लूर गावातून त्याला अटक करण्यात आली. त्याला स्थानिक न्यायालयात हजर केले असता, १६ ऑगस्टपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे.

## ज्येष्ठ गायक कुमार सानू यांनी बॉलिवूडमध्ये काम मिळत नसल्याने व्यक्त केली चिंता

मुंबई : नव्वदच्या दशकातील बॉलिवूड सिनेमात कुमार सानू यांचे गाणे असेल, तर सिनेमा जबरदस्त हिट असे समीकरण होते. आजही त्यांची गाणी विशेष लोकप्रिय आहेत,

मात्र अलीकडेच त्यांनी एकंदरित बॉलिवूडबद्दल निराशा व्यक्त केली.

बॉलिवूड इंडस्ट्रीचे दिग्गज गायक कुमार सानू यांनी अशाप्रकारे अनेक दशके त्यांच्या सुरेल आवाजाच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्यांच्या नावावर असंख्य हिट गाणी आहेत. कुमारजींनी एक काळ त्यांच्या



गायनाच्या शैलीमुळे गाजवला आहे. बॉलिवूडमध्ये एक यशस्वी कारकीर्द असूनही सानू यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत अलीकडे उपलब्ध होणाऱ्या मर्यादित कामाच्या संधींबद्दल निराशा व्यक्त केली.

प्रेम आणि आदर मिळत असूनही

कुमार सानू यांनी अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत त्यांना बॉलिवूडमध्ये पार्श्वगायनासाठी मर्यादित संधी मिळत असल्याचे सांगितले. त्यांनी यशस्वी कारकिर्दीविषयी भाष्य केले. त्यांनी म्हटले की त्यांना नेहमी सन्मानित केले जाते आणि त्यांची गाणीदेखील अनेकांना आवडतात, मात्र बॉलिवूडमध्ये त्यांच्या आवाजाचा अधिक वापर का केला जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

याबाबत त्यांनी निराशा व्यक्त केली.

बॉलिवूड इंडस्ट्रीकडून मिळणारी आपुलकी अनिश्चित असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केले. कुमार सानू म्हणाले की, मला आश्चर्य वाटते की, मला आदर आणि प्रेम मिळत असूनही ते अधिक गाण्यांसाठी माझा आवाज का वापरत नाहीत. हे प्रेम खरे आहे की नाही हे माहीत नाही, परंतु आदर नक्कीच आहे.

कुमार सानू यांच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, गायकाने अलीकडेच यूएसए आणि कॅनडा असा परदेश दौरा केला. याशिवाय अलीकडेच त्यांनी अभिनेता मानव कौलची मुख्य भूमिका असणाऱ्या त्रिभुवन मिश्रा सीए टॉपर या चित्रपटात स्वीकार कर लेना या गाण्याला आवाज दिला होता.

## यांना पुन्हा मराठ्यांनी घेरलं, विधानसभेत मनसेला बसणार फटका?

नांदेड: मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन दिवसीय नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांचा हा दौरा ७ आणि ८ ऑगस्टपर्यंत असून आज राज ठाकरे यांचे शहरात जंगी स्वागत करण्यात आले.राज ठाकरेंच्या या दौऱ्यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. राज ठाकरे हे लातूरहून नांदेड शहरात आले. पण इथे देखील राज ठाकरेंना मराठा समाजाच्या आक्रोशाला सामोरं जावं लागलं. दरम्यान, या सगळ्या घडामोडीमुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मनसेला याचा फटका बसणार का? याची जोरदार चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

नांदेडमध्ये नेमकं काय घडलं?

राज ठाकरे हे लातूरहून नांदेडला आल्यानंतर ते सर्वात आधी शासकीय विश्रामगृहात गेले. त्यानंतर काही वेळाने ते नांदेडमधील एका खासगी हॉटेलमध्ये जाण्यास निघाले जिथे त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पण याचवेळी त्यांना मराठा आंदोलकांचा सामना करावा लागला.

जेव्हा राज ठाकरेंचा ताफा निघाला तेव्हा अचानक एक मराठा लाख मराठाच्या घोषणा देत काही आंदोलकांनी त्यांचा ताफा रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी वेळीच आंदोलकांना ताब्यात घेतलं. त्यामुळे राज ठाकरेंच्या ताफ्याला कोणताही अडथळा आला नाही.




दरम्यान, आंदोलकांना ताब्यात घेऊन पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. दुसरीकडे राज ठाकरेंचा ताफा शहरातील सुरक्षित परिसरात थांबला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी मनसे सैनिकांची बैठक बोलावली असून यामध्ये ते महत्त्वाची बैठक घेणार आहेत.धाराशिवमध्येही मराठा आंदोलकांनी राज ठाकरेंना घेरलेलं

दरम्यान, ५ ऑगस्टला राज ठाकरे यांना धाराशिव येथे देखील संतप्त मराठा आंदोलकांसमोर जावं लागलं होतं.

राज ठाकरे सध्या महाराष्ट्र दौरा करत आहेत. यावेळी धाराशिवमध्ये एका हॉटेलमध्ये राज ठाकरे विश्रांतीसाठी थांबलेले असताना चार ते पाच मराठा आंदोलक हॉटेलमध्ये शिरले होते. या आंदोलकांनी राज ठाकरे यांच्या बॉडीगार्डजवळ भेटीची मागणी केली होती. मात्र राज ठाकरेंकडून भेट नाकारली होती. राज ठाकरे यांनी आम्हाला भेटीची वेळ द्यावी आणि मराठा आरक्षणावर आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी मराठा आदोलकांनी केली होती.हा संपूर्ण प्रकार हॉटेलमध्ये घडत असताना राज ठाकरे हॉटेलमधून खाली आले आणि त्यांनी सर्वप्रथम आंदोलकांना घोषणा थांबण्यास सांगितले. त्यानंतर राज ठाकरे यांनी तुम्हाला माझ्याशी बोलायचं आहे ना, मग वरती या,असे म्हटले. पण चर्चा ही सर्वांसमोर व्हावी अशी मागणी आंदोलकांनी केली. ज्यासाठी राज ठाकरे हे तयार झाले नाही. यामुळे संतप्त झालेल्या मराठा आंदोलकांनी थेट राज ठाकरे मुर्दाबादच्या घोषणा दिल्या होत्या.

## मला मुख्यमंत्री करणार असं सांगितलं असतं तर अजितदादा फडणवीसांसमोर थेटच बोलले

ठाणे, : ''देवेंद्र फडणवीस यांनी जर मला मुख्यमंत्री करणार असे बोलले असते तर संपूर्ण पक्षच घेऊन आलो असतो, असं विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

प्रा.डॉ.प्रदीप ढवळ लिखित योद्धा कर्मयोगी एकनाथ संभाजी शिंदे पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आज ठाणे येथील गडकरी रंगायतन येथे पार पडला. यावेळी अजित पवार तुफान फटकेबाजी केली. अजित पवार आपल्या मिश्किल बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. याचाच प्रत्यय उपस्थितांना यावेळी आला.काय म्हणाले अजित पवार?

ठाण्याच्या या ऐतिहासिक नगरीत खुप काही घडलंय. सामान्य नागरीक ते मुख्यमंत्री असा प्रवास एकनाथराव शिंदे यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांची टर्म ९९ साली सुरु झाली. एकनाथ शिंदेंची कारकिर्द २००४ ची आहे. मी यांच्या आधीचा आहे, हे सर्व पुढे गेले मी तिथेच राहिलोय. मी देवेंद्र फडणवीस यांना म्हणालो मला जर मुख्यमंत्री करणार असं बोलले असते तर संपुर्ण पार्टीच घेवून आलो असतो. मला जर संधी दिली असती तर मी पूर्ण पार्टी आणली



असतीय त्यांनी तर फक्त आमदराच आणले. आता वेळ निघून गेली. माझे आणि फडणवीस-शिंदे यांचे संबंध आधीपासूनच चांगले आहेत.

कोण ढेकून म्हणतोय, कोणी काय म्हणतोय ही महाराष्ट्राची परंपरा नाही. सुधाकर नाईक मुख्यमंत्री असताना मी विधिमंडळात गेलो. बरेच मुख्यमंत्री झाले. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखा लोकांच्या गराड्यात राहणारे मुख्यमंत्री फक्त एकनाथ शिंदे आहेत. वसंतराव नाईकांपासून ते एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत सर्वांत जास्त सह्या करणारे मुख्यमंत्री म्हणजे एकनाथ शिंदे. मला सुद्धा शेतीची आवड आहे. पहाटे ६ वाजता शेतात जातो. पण एकनाथराव यांच्या एवढे फॉलोअर माझे नसल्याने माझे फोटो येत नाहीत. मी बारामतीला जातो तेव्हा पहाटे सहाला शेतात जातो. परंतु, मीडिया आमची फॅन नसल्याने आमचे फोटो, व्हिडीओ येत नाही.मी अनेकांना संधी दिली, त्यांना शिंदेंनी नेलं : अजित पवारपुस्तकात शिंदे यांचे गुरू बाळासाहेबांचा फोटो आणि दिघेंचा फोटो हवा होता असे माझे मत आहे. सगळे फॉलोअर एकनाथ शिंदे यांच्याकडे गेलेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गाव दरे हे जावळी तालुक्यात नाही तर महाबळेश्वरमध्ये आहे. एक शाखा प्रमुख ते मुख्यमंत्री असा प्रवास खुप खंडकर आहे. नातवावर प्रेम करणारा आजोबा या पुस्तकात थोडाच उल्लेख आहे.

संपादकीय

## नातेसंबंध कसे ?

त्यांची लक्षणं कोणती याविषयी माहिती घेतली. आता आपण आपल्या घरात, नात्यात, कार्यालयात, ओळखीत ज्या ज्या लोकांशी आपला संपर्क, संबंध येतो आपल्याला दैनंदिन ज्यांच्याशी कामे पडतं, बोलावे लागतं पण त्यातून फक्त मनस्ताप होतो आणि आपला वेळ, दिवस खराब होतो, आपला मूड जातो, आपली मनस्थिती बिघडते अशा टॉक्सिक नातेसंबंधाबद्दल जाणून घेणार आहोत. अनेकदा आपल्याला इच्छा नसतानाही काही लोकं आपल्या आयुष्यात नातेवाईक म्हणून, कौटुंबिक संबंध म्हणून आलेले असतात. मित्र-मैत्रिणी, शेजारी, सहकारी याबद्दल आपल्याला न पटल्यास, न आवडल्यास त्यांच्यापासून आपण अलिप्त होऊ शकतो, लांब राहू शकतो, यात आपण इतर पर्याय शोधू शकतो. असे टॉक्सिक नातेसंबंध सांभाळत बसणे आपल्याला बंधनकारक नसते. या उलट नातेवाईक, घरातील लोक, अगदी आई-वडील, बहीण- भाऊ, दीर, नणंद, सासू, सासरे, मुलं स्वतःच्या अगदी जवळची लोकं, सहकारी, शेजारी यांच्यापासून मात्र कोणीही सहजासहजी वेगळं होऊ शकत नाही कारण अनेक नातेसंबंध, कुटुंब, समाज, घरातील ज्येष्ठ लोकं, लहान मुलं या सगळ्यांचा विचार करून, भविष्याचा विचार करून टिकवले जातात.

आपल्या घरात, रक्ताच्या नात्यात जर काही व्यक्ती खूप टॉक्सिक असतील, आपल्याला मनस्ताप देणाऱ्या, आपली मानसिकता खराब करणाऱ्या असतील, तर मात्र या लोकांना कसं वेळीच ओळखायचं, अशा लोकांशी कसं वागायचं, स्वतःला होणारा त्रास कसा कमी करायचा याबद्दल माहिती असणे महत्त्वाचे आहे. आता आपल्याच घरातील, नात्यातील कोण आपलं खरंच हितचिंतक आहे, शुभचिंतक आहे, कोणाला आपण मनापासून आवडतोय, कोण आपला आदर करत आहे? कोणाचं आपल्यावर खरं प्रेम आहे, आपुलकी आहे? कोण आपल्यावर जळतं, कोणाला आपलं वाटोळं झालेलं पाहायचं आहे, कोण आपल्या तोंडावर गोड बोलतं पण आपल्या मागे आपल्याला बदनाम करण्यात सक्रिय असते हे पहिले समजावून घ्या. तुम्ही दुःखी असल्यावर कोणाला मज्जा वाटते, तुमच्यासोबत वाईट घडलं, तुम्हाला त्रास झाला, तुम्हाला अपमानित करण्यात आल्यावर कोण फक्त गंमत बघत राहतं याचं निरीक्षण करा. तुम्हाला टॉर्चर करण्याची संधी कोण शोधत असते, तुम्हाला सतत घालून पाडून बोलणं, तुमच्याशी कायम खोटं बोलणं, तुमच्या चांगल्या बोलण्याचा पण विपरीत अर्थ काढणं, तुम्हाला अपमानित होताना पाहणं यात कोण कायम पुढे असते हे जाणून घ्या. तुम्हाला टोमणे मारण्यात, तुम्हाला पाहून तोंड वेंगाडण्यात, विचित्र हावभाव करण्यात कोण पुढे असते हे तपासा.

आपल्या जवळील, नात्यातील अनेक लोकं अशी असतात ज्यांना आपला त्रास, आपलं दुःख, आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी माहिती असतात तरी ते आपल्याला त्या सहन करायला, स्वीकारायला भाग पाडतात. आपल्या इच्छेविरुद्ध आपल्यावर त्यांच्या सोईनुसार गोष्टी लादणे त्यांना आवडतं. आपली कधी मजा घेता येईल, चेष्टा करता येईल, आपल्या जखमेवर कसं मीठ चोळता येईल याची हे नातेवाईक वाट पाहत असतात. त्यामुळे आपला वीक पॉइंट, कमकुवत बाजू लक्षात ठेवून त्यावर आपली खिल्ली कोण उडवतं याचं निरीक्षण करा.अगदी आपला डीपी, आपला फोटो, स्टेट्स, एखादी पोस्ट, एखादा मेसेज, व्हीडिओ, आपले कपडे, आपलं दिसणं, राहणं, वागणं बोलणं, आपल्या सवयी यावर सतत टीकाटिप्पणी कोण करत हेही लक्षात ठेवा.

काही जण तुम्हाला विनाकारण छेडत असतात. घरातील, बाहेरील कोणताही विषय घेऊन तुमचा संबंध असो किंवा नसो ते तुम्हाला त्यात ओढतात, तुम्हाला खूप संताप येईल, राग येईल, तुमचा दिवस खराब होईल असं काहीतरी ही लोकं प्रत्यक्ष, फोनवर अथवा मेसेज करून तुम्हाला डिवचतात. अशी टॉक्सिक लोकं प्रचंड नकारात्मक असतात. त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात सगळं काही चुकलेलं असतं, मनाविरुद्ध घडलेलं असते, त्यांना स्वतःच्या आयुष्यात खूप तडजोड करावी लागलेली असते म्हणून प्रत्येक नात्याकडे, प्रत्येक नात्यातील व्यक्तीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन नकारात्मक आणि कलुशित झालेला असतो. अशा लोकांच्या स्वतःच्या आयुष्याला काहीच अर्थ राहिलेला नसतो, करण्यासारखं काहीही भविष्य नसतं, सगळं अंधारात असतं त्यामुळे ते इतरांमध्ये काहीना काही कमतरता शोधून त्यांच्या खोड्या काढत असतात. इतरांना कमजोर करणे, इतरांना मूर्ख, नालायक

# दापोली कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा होतोय मानसिक व शारीरिक छळ.कोण करतय हा प्रकार

दापोली०८ : दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालय दापोली येथे चतुर्थ वर्षात शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थ्याचा त्याच्याच वर्गातील ३ विद्यार्थ्यांनी शारिरिक व मानसिक छळ केल्याची तक्रार या विद्यार्थ्याने या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांचेकडे केली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार कृषी महाविद्यालय दापोलीच्या चतुर्थ वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी यांना कृषी शिक्षणाचे प्रत्यक्ष शिक्षण शेतात घेता यावे यासाठी त्यांना साडेचार महिने कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील गावांमधील शेतकरी यांचेकडे पाठवले जाते. विविध गावात राहून हे विद्यार्थी शेतीचे धडे घेत असतात तसेच शेतकऱ्याना विद्यापीठाने केलेल्या




संशोधनाची माहिती देतात. अशाच ११ विद्यार्थी यांचा एक गट रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील एका गावात कार्यरत होता. त्यातील एका विद्यार्थाला याच गटातील अन्य ३ सहकारी विद्यार्थी त्रास देत होते. मात्र या विद्यार्थ्याच्या वडिलांना हृदयविकाराचा त्रास होत असल्याने त्याने या त्रासाबाबत त्यांना माहिती दिली नाही. त्याच्या या ३ सहकारी मित्रांनी या गावात प्रशिक्षण घेण्यासाठी गेल्यावर तीसऱ्या दिवसापासून या मुलाला शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामध्ये अन्य सहकारी मित्र यांचेसमोर अंतर्वस्त्रावर नाचायला लावून त्याचा व्हिडीओ तयार करणे, रात्री उंट होण्यास सांगून चादर अंगावर टाकून मारहाण करणे, दारू पाजून गुप्तांगाला दोरी बांधून त्रास देवू अशीही त्याला धमकी देण्यात आली असे या विद्यार्थ्याने कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांचेकडे केलेल्या लेखी तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मकरंद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती त्यात सदस्य म्हणून डॉ. आनंद मयेकर (रावे कार्यक्रम प्रमुख), डॉ. जीवन आरेकर (कार्यक्रम अधिकारी), आर. एस. गुजर (सहाय्यक कुलसचिव) यांचा समावेश आहे. या समितीने सर्व ११ विद्यार्थी यांचेकडून माहिती घेतली व मिळालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे या विद्यार्थ्याला त्रास देणाऱ्या ३ विद्यार्थ्यांना अन्यन पाठवण्यात आले असल्याची माहिती कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मकरंद जोशी यांनी दिली. या प्रकरणी सखोल चौकशीकरण्यात येणार असल्याचेही डॉ. जोशी यांनी सांगितले. हा प्रकार रॅगिंगचा आहे का व असल्यास रॅगिंग प्रतिबंधक कायद्यानुसार त्रास देणाऱ्या विद्यार्थी यांचेवर कारवाई करणार का असे विचारले असता चौकशी सुरु असून त्यात असा प्रकार निष्पन्न झाला तर आम्ही तसा अहवाल विद्यापीठाचे शिक्षण संचालक यांचेकडे पाठवू. त्यावर ते निर्णय घेतील असे डॉ. जोशी यांनी सांगितले.

# तहसील कार्यालय सुधागड-पाली येथे महसूल पंधरवडा अंतर्गत शेती, पाऊस आणि दाखले वाटप कार्यक्रमाचे आयोजन

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/ मंगेश यादव

दिनांक ०६ ऑगस्ट रोजी सुधागड तालुका तहसील कार्यालयात महसूल पंधरवडा अंतर्गत शेती, पाऊस आणि दाखले कार्यक्रमाचे आयोजन सुधागड तालुका कृषी कार्यालय व महसूल विभागाच्या संयुक्तरीत्या कार्यक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रमात कृषी व महसूल विभागाच्या वतीने शेतकरी बांधवांसाठी पूर्व मान्सून व मान्सून कालावधीत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या घराचे, शेतीचे, फळबागांचे तसेच खरीप हंगामामध्ये घेण्यात येणाऱ्या पिकांचे विमा उतरवण्याकरता उपस्थित शेतकऱ्यांपैकी काही शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात सातबारा व ८-अ चे वाटप करण्यात आले. तसेच आपत्ती व्यवस्थापक अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार बाधित नागरिक/ नागरिक यांना शासनाकडून आर्थिक मदत देय आहे त्या अनुषंगाने सुधागड तालुक्यात माहे जुलै २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्या शेतकरी/नागरिक यांचे पशुधनाचे नुकसान झाले त्यांना महाराष्ट्र शासन, महसूल, वनविभाग यांचे कडील शासन नियम क्रमांक सी एल एस-२०२ प्र. क्र.३४९म ३ दि.२७ मार्च २०२३ अन्वये पशुधन नुकसान भरपाई भिकू नारायण महाले रा. वावळोली शेळी संदर्भात ४००० हजार रुपये देण्यात आले, रमेश रामाजी आखाडे रा. वासुंडे म्हैस संदर्भात नुकसान भरपाई ३७५०० रू. देण्यात आले तसेच हेमा पांडू वारगुडे रा. करंजई यांना ३७५०० रुपये देण्यात आले हे वाटप आर्थिक मदतीचे धनादेशाद्वारे करण्यात आले . सदर कार्यक्रम कृषी विभाग व महसूल विभागातून राबविण्यात आला. सदर कार्यक्रमात महसूल प्रशासनाच्या वतीने सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार, निवासी नायब तहसीलदार फुलपगारे, महसूल नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे, निवडणूक नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी व कार्यालयीन कर्मचारी, कृषी विभागामार्फत कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक,



कृषी सेवक , शेतकरी, अन्य नागरिक यांच्या उपस्थितीत सुधागड तालुक्यातील लाभार्थ्यांना वाटप करण्यात आला. आजचा कार्यक्रम महसूल कार्यालयातील इचके अण्णा यांनी हँडल केला. शेती, पाऊस याबाबत काही नुकसानी झाल्यास तहसील कार्यालय व कृषी कार्याल याची संपर्क साधावा अशी आवाहनही पाली तहसीलदार उत्तम कुंभार व तालुका कृषी अधिकारी यांनी नागरिक आणि शेतकऱ्यांना केले.



## आतुरता दहिकाला उत्सवाची

प्रतिनिधी (सनी आडेकर)दहिकाला म्हटले कि नवतरूणांमध्ये उत्साह संचारतो आणि मटकी फोडीची जोरदार तयारी, यासाठी साहसी खेळासाठी सर्व मंडळे तयारीला ही लागलेली दिसतात असेच कोकणातील अधिक भार असलेल्या काळबादेवी चे नावाजलेले गोविंदा पथक कोकणचा राजा गोविंदा पथक यांनी सरावा पुर्व शुभारंभ नुकताच जल्लोषात पार पाडला यावेळी पथकाचे अध्यक्ष रोहन हुमणे, राजु सावंत,किसन धाडवे, जनार्दन तटकरे, सुभाष बालगुडे, यांसह पथकाचे सर्व कार्यकर्ते, हितचिंतक, पधकातील बाळगोपाळ नवतरूण वर्ग,मोठ्या संख्येने उपस्थित होते

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात महसूल पंधरवडा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

आंबडवे-मंडणगड

येथील विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आंबडवे व तहसील कार्यालय मंडणगड यांच्या संयुक्त विद्यमाने महसूल पंधरवडा दिनानिमित्त नुकतेच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून मंडणगडचे नायब तहसीलदार अमरसिह जाधव हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी आयोजित कार्यक्रमात युवा संवाद अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मतदार जागृती व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व परीक्षेचे स्वरूप व संधी तसेच त्यासाठी असणारा अभ्यासक्रम याबाबत सखोल



असे मार्गदर्शन केले. त्यानंतर महसूल विभागातील कर्मचारी पवार साहेब, अमोल पाटील, नयन बोबडे, दिपाली केणी यांनी विविध प्रकारचे शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक असणारे दाखले, व केंद्र व राज्यशासनाद्वारे देण्यात येणार्या विविध शिष्यवृत्ती तसेच शासकीय योजना यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, वयोश्री योजना, अशा विविध योजना विषयी त्यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे सहा. प्रा. मंगेश ठसाळे, राजेंद्र राऊत, सायली घाडगे व ग्रंथपाल डॉ. दिगंबर हेमके तसेच अंबडवे येथील सरपंच सौ. दिपिका जाखल व ग्रामस्थ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहा. प्रा. अमोल राजेशिर्के यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून आयोजित कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर आभारप्रदर्शन अंश तांबे याने केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

## शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतीदीन निमित्त भव्य चित्रकला स्पर्धा

द. रा. जि. प्रतिनिधी: संतोष उध्दरकर.

म्हसळा: '' ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार या साठी शिक्षण प्रसार'' या ध्येयाने प्रेरित होऊन ज्या महामानवाने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापुर या संस्थेची स्थापना केली ते म्हणजे डॉ. बापूजी साळुंखे यांचा ८ ऑगस्ट हा स्मृतिदीन म्हणून साजरा करण्यात येतो, या स्मृतिदिन निमित्त दि. ३ ऑगस्ट रोजी न्यु इंग्लिश स्कुल म्हसळा येथे भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या प्रसंगी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक शेख. एम. ए. पर्यवेक्षक गायकवाड. एन. एस. यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेसाठी तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळांना आवाहन करण्यात आले होते, त्या नुसार तालुक्यातील एकुण ५ शाळांनी सहभाग नोंदवला, या स्पर्धेत पहिली ते बारावी चे एकुण १३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन संस्थेने दिलेल्या विविध विषयांवर चित्रे रेखाटण्यात आली

. या स्पर्धेचे संपूर्ण नियोजन कला शिक्षक बंडगर सर यांनी केले होते व संपूर्ण शिक्षकवर्ग यांच्या सहकार्याने हि स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. या मध्ये अ. ब. क. ड गटनिहाय विजेते स्पर्धक निवडण्यात आले.

प्रथम क्र. कु. जैनी हेमंत कांबळे. ई.४थी. रा. जि. प. शाळा बनोटी.प्रथम क्र.कु. स्वराज संतोष उध्दरकर. ई. ७ वी. न्यु ईग्लिश स्कुल, म्हसळा.प्रथम क्र. कु.

ईश्वरी संजय खताते. ई. १० वी. न्यु इंग्लिश स्कुल, म्हसळा.प्रथम क्र. कु. चांदणी तुकाराम दुरे. ई. ११वी. न्यु इंग्लिश स्कुल, म्हसळा.व्दितीय क्र. कु.अलिझा इरफान गणतारे. ई. ४ थी. आयडिएल, स्कुल, म्हसळा.व्दितीय क्र. कु. आदित्य प्रकाश राठोड. ई. ७ वी. न्यु. इंग्लिश स्कुल, म्हसळा.व्दितीय क्र. कु. निरजा अंकित धोत्रे. ई. ९ वी. न्यु. ईग्लिश स्कुल, म्हसळा.व्व्दितीय क्र. कु. मयूर विजय साळवी. ई. ११ वी. न्यु. इंग्लिश स्कुल, म्हसळा.त्रितीय क्र. कु.सिमर ाह सुहेल बगदादी. ई. ४ थी. आयडिएल स्कुल, म्हसळा त्रितीय क्र. कु. अलिया अतिफ म्हैसकर. ई. ६ वी. आयडिएल स्कुल, म्हसळा.त्रितीय क्र. कु. सहेर तबरेज पेजे. ई. ८ वी. आयडिएल स्कुल, म्हसळा.व्त्रितीय क्र. कु. अरुणा गुरु पवार. ई. ११ वी. न्यु. इंग्लिश स्कुल, म्हसळा.ह्या सर्व विजेते स्पर्धक यांचे संस्थेच्या वतीने कौतुक करून अभिनंदन करण्यात आले. लवकरच सर्व विजेते विद्यार्थ्यांना

शाळेच्या वतीने पारितोषिक वितरण करून सन्मानित करण्यात येईल असे कला शिक्षक बंडगर सर यांनी सांगितले.

# रेल्वे तिकिटांचा काळाबाजार थांबवा कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना तिकीट उपलब्ध करून द्या आ.भास्कर जाधव यांची केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी

चिपळूण (ओंकार रेळेकर)

गणपती उत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना रेल्वेची तिकिटे उपलब्ध करून द्या आणि तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करा अशी मागणी शिवसेना नेते तथा गाँगल विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमदार भास्करराव जाधव यांची केंद्रीय रेल्वे मंत्री आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे .

केंद्रीय रेल्वे मंत्री पियुष गोयल यांना दिलेल्या निवेदनात गणेशोत्सवासाठी मुंबईतून कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना तिकिटे उपलब्ध करून देणे तसेच तिकीट आरक्षणात काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करणेबाबत आ.जाधव यांनी मागणी केली आहे.यंदाच्या गणेशोत्सवासाठी मुंबई ते कोकण दरम्यान २०२ विशेष रेल्वे गाडया चालवण्याच्या मध्य रेल्वेच्या नियोजनाला भारतीय रेल्वेने हिरवा कंदील दिला आहे. परंतु, या विशेष रेल्वेगाड्यांचे बुकिंग सुरु होताच अवघ्या काही मिनिटात बुकिंग फुल्ल झाल्याचे दिसून आले. त्यामुळे हजारो कोकणवासी चाकरमान्यांमध्ये तिकिटे न मिळाल्यामुळे तीव्र संतापाची भावना आहे. तिकीट आरक्षणात काळाबाजार सुरु असल्याचे मागील वर्षी तपासाअंती स्पष्ट झाले होते. तथापि, त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्यांच्या पाठीशी शासन आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.गणेशोत्सव म्हणजे कोकणातील सर्वात मोठा आणि आवडता सण. गणेशोत्सवाला मुंबईतून मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात येतात. साधारण गणेश चतुर्थीच्या तीन दिवस आधीपासून कोकणातील मूळगावी जाण्याचे कोकणवासीयांचे नियोजन असते. यंदा गणेशोत्सवास ७ सप्टेंबर रोजी सुरुवात होणार आहे. गणेशोत्सवादरम्यान मध्य रेल्वे २०२ विशेष गाड्या तर पश्चिम रेल्वेकडून ५६ गाड्या सोडण्यात येणार आहेत. गणपती स्पेशल गाड्यांचं बुकिंग पुन्हा सुरु झाले होते. मात्र, अवघ्या पाच मिनिटात २५८ गणपती स्पेशल ट्रेनचे बुकिंग फुल्ल झाले आहे. वेटिंग लिस्ट ७०० ते ८०० च्यावर पोहोचली आहे. गेल्यावर्षी गणेशोत्सवाची तिकिटे काढताना कोकणकन्या एक्स्प्रेसची प्रतीक्षा यादी अवघ्या दीड मिनिटांतच एक हजारांपार गेली होती. त्यानंतर तिकीट आरक्षणात गैरप्रकार झाल्याची शंका प्रवाशांकडून व्यक्त केली होती. तपासाअंती यात अनेक तिकीट आरक्षण खाती बनावट असल्याचे उघड झाले होते. तिकीट आरक्षणात काळाबाजार केला जात असल्याचे स्पष्ट होऊनही याबाबत कोणतीही चौकशी वा दोषींवर कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर आहे. गेल्या १२ वर्षांपासून सुरु असलेले मुंबई ते गोवा महामार्गाचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. त्यातच खाजगी बसचालकांकडून गणपती उत्सवाच्या काळात २ ते अडीच हजार रुपयांचा दर लावला जात आहे. ही अक्षरशः लुटमार आहे. ही बाब अत्यंत गांभीर्याने घेऊन मुंबईतून कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना रेल्वेची तिकिटे उपलब्ध करून द्यावीत, खाजगी वाहनांच्या दरांवर नियंत्रण आणावे आणि तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आमदार भास्कर जाधव यांनी केली आहे.



## मुंबई स्थित ब्रीचं कँडी व नानावटी हॉस्पिटल येथील सुप्रसिद्ध स्पाईन सर्जन डॉक्टर आदित्य काशीकर दिनांक १० ऑगस्ट रोजी अपरांत हॉस्पिटल येथे येणार.



सतत पाठीचे दुखणे – हाता पायामध्ये मुंग्या येणे – वेदनामुळे हात व पाय हलवण्यात अडचण होणे. जड वस्तू उचलताना त्रास होणे. – मणक्याची नस दबणे. यासारखी लक्षणे व आजार असल्यास आजच आपली नोंदणी करा.

डॉ.आदित्य काशीकर(स्पाईन सर्जन)

वेळ दिनांक- १०/०८/२०२४ सकाळी १० ते १ संपर्क ७९९८८९८९८९ ७९९८७३७३७३

## पएसो.प्राथमिक शाळा पोफळीचा एक राखी सैनिकांसाठी हा स्तुत्य उपक्रम

पोफळी -परशुराम एज्युकेशन सोसायटी चिपळूण संचालित, प्राथमिक शाळा,पोफळी या शाळेतील इ.१ली ते इ.४थी च्या विद्यार्थ्यांनी आपल्या चिमुकल्या हातांनी राख्या बनवून सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना आवर्जून पाठविल्या आहेत. सीमेवर लढणाऱ्या सैनिक बांधवांना राख्या पाठवण्याचे हे आमचे पाचवे वर्ष असून या राख्या प्रेमाच्या आणि विश्वासाच्या नाजूक धाग्यांनी विणल्या गेल्या आहेत. या रक्षाबंधनाच्या बंधनातून सीमेवर रक्षण करणाऱ्या बांधवांना शत्रूशी लढण्याचे बळ आणि दीर्घायुष्य लाभावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना ! या राख्या सैनिक बांधवांनी सोमवार दि.१९ऑगस्ट २०२४ रोजी येणाऱ्या रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या हातावर बांधाव्यात अशी आमच्या प्रशालेतील सर्व बालभगिनी, विद्यार्थी, शिक्षक बंधू-भगिनी यांची मनापासून इच्छा आहे .

यासाठी दोन ठिकाणी राख्या स्पीडपोस्टने पाठवण्यात आल्या आहेत. विश्वबंधुत्वाच्या नात्याने आमच्या प्राथमिक



शाळा, पोफळीचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर, शाळा व्यवस्थापन समिती, कार्यकारिणी उपाध्यक्ष श्री.वैभवजी पवार,पालक-शिक्षक कार्यकारिणी उपाध्यक्षा सौ.सपना थोरवडे,माध्यमिक विभागाचे श्री.निलेश काणेकर सर,ज्येष्ठ शिक्षिका सौ.शिवानी शिंदे,सौ.प्रतिभा धुमाळ,श्री.अशोक मिसाळ,सौ.साधना गायकवाड,सौ. मनिषा नाईक,सौ.अक्षता साळवी तसेच विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.शौर्य नरळकर , विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.आध्या चव्हाण-पाटील यांच्या हस्ते या नवोपक्रमांतर्गत राख्या पाठविण्यात आल्या.ङ्क सौ.मनिषा नाईक मॅडम यांनी या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये राखी बनवण्याचे कौशल्य,तर सर्व शिक्षकानी सैनिकांविषयी प्रेम, आदर व कृतज्ञता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.

## कर्जतमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर भवनाला ५ कोटींचा निधी मंजूर

कर्जत (जयेश जाधव) :

शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन व्हावे, अशी आंबेडकरी जनतेची मागणी होती. आमदार महेंद्र थोरवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन उभारणार असल्याचे जाहीर केले होते. आमदार थोरवे यांच्या पाठपुराव्यामुळे या भवनासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे आंबेडकरी जनता समाधान व्यक्त करीत आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन यापूर्वीच उभारले गेले असते. मात्र जागे संबंधी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे हे भवन रखडले होते. आमदार थोरवे यांनी आंबेडकरी जनतेशी संवाद साधून जागेची अडचण दूर केली आणि त्यासाठी राज्यशासनाकडून पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला.

याविषयी शिवसेना बाळासाहेब भवन सभागृहात एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संकेत भासे यांनी महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून डॉ. आंबेडकर भवन लवकरच उभारले जाईल, असे सांगून हे भवन कसे साकारले जाईल, त्याची प्रतिकृती स्क्रीनचा माध्यमातून दाखविली. यासाठी पाठपुरावा केल्याने, शासनाने ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे स्पष्ट केले.

## विनेश'काले

विनेश फोगट या जिगरबाज, लढाऊ आणि कमालीच्या प्रतिकूलतेतही स्पर्धात्मकता कायम ठेवू शकणाऱ्या जिद्दी खेळाडूविषयी अतीव करुणा, सहानुभूती, सहवेदना व्यक्त केल्यानंतर ही काही उदाहरणे : २०१७ च्या आशियाई स्पर्धांत भारतीय धावपटू संघ बाद केला गेला, कारण धावताना त्यांच्याकडून 'अनवधानाने' मार्गिका (लेन) बदलली गेली. त्यानंतर दोन वर्षांनी २०१९ साली आंतरराष्ट्रीय स्क्वॉश स्पर्धांत भारतीय संघ आपल्या महामंडळाच्या दफ्तर दिरंगाईने पोहोचूच शकला नाही. त्याआधी एक वर्ष २०१८ च्या जाकार्ता आशिया स्पर्धेच्या उद्घाटनात भारतीय ध्वजवाहकांची भलतीच फजिती झाली. गेल्या टोकियो ऑलिम्पिक्समधून आपली कमलप्रीत कौर अशीच बाद ठरली. गेल्या सहस्राकात १९९८ सालच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांत पी. टी. उषा खिळ्यांचे बूट घालून धावल्या होत्या आणि २०१६ साली द्युती चांदकडूनही असाच प्रमाद घडला. नव्या सहस्राकाच्या पहिल्याच वर्षी २००० सालच्या स्पर्धांत सीमा पुनिया थाळीफेक स्पर्धेतून बाद केली गेली. आपला कोणी खेळाडू स्पर्धाकाळात खोकल्याचे औषध घेतल्याने बाद ठरतो तर कधी अन्य काही सेवन करू नये ते सेवन केल्याने स्पर्धेबाहेर काढला जातो. वरील उदाहरणे अगदी वानगीदाखल. क्रीडाप्रेमी, अभ्यासक अशी आणखी काही उदाहरणे देऊ शकतील. या सगळ्यांतून आपले काही दुर्गुण पुन:पुन्हा समोर येतात.

व्यवस्था/ नियमन यांस गांभीर्याने न घेण्याची वृत्ती, सर्वत्र 'चलता है' मानसिकता, शास्त्रकाट्याच्या कसोट्यांपेक्षा उत्स्फूर्ततेवर वेळ मारून नेण्याची वृत्ती आणि या सगळ्यांच्या जोडीला याच दुर्गुणांनी युक्त भारतीय क्रीडा व्यवस्थापनाची बेफिकिरी. देशात काहींना काही वा त्यातील आणखी काहींना 'सर्व काही' मॅनेज करता येत असेल. येतेही. वाटेल ते गैरव्यवहार, नियमांकडे सर्रास काणाडोळा केला तरी त्यांचे काही बिघडत नाही आणि ते बिघडत नाही म्हणून सामान्यांनाही त्याबाबत काही वाटत नाही. ''कायद्यासमोर सर्व समान असले तरी काही अधिक समान असतात'', हे ऑर्वेली सत्य आपल्या जगण्याचे तत्त्वज्ञान! त्यामुळे नियम काटेकोरपणे पाळायचे असतात आणि आपण तसे नसलो तरी जगाच्या पाठीवर असे नियम पाळणारे असतात याचेच आपणास विस्मरण होते. हे वास्तव एकदा लक्षात घेतले की विनेश फोगट हिच्यासंदर्भात काय झाले, त्याचा विचार-विश्लेषण करणे सोपे ठरेल. विनेश ज्या वजनी गटात खेळत होती त्या गटात स्पर्धेआधी आणि नंतर वजनात किमान आणि कमाल किती फेरफार खपवून घेतला जातो, याचे नियम ऑलिम्पिक स्पर्धेआधीच निश्चित केले गेलेले असतात आणि इतक्या उच्च दर्जाच्या स्पर्धांत हे नियम कसोशीने पाळण्यासाठी काय काय खबरदारी घ्यायला हवी हेही विनेश आणि त्यापेक्षा तिच्या व्यवस्थापकांस ठाऊक असते. निदान तसे अपेक्षित असते. इतक्या उंचीवर स्पर्धक गेल्यावर त्याच्यासमवेत मानसोपचारतज्ज्ञासह आहार-विहारतज्ज्ञही असतोच असतो. स्पर्धा काळात काय खावे, काय खाऊ नये याचे नियमही या सर्वांस माहीत असतात. अशा स्पर्धांत एक फेरी संपल्यानंतर आणि पुढच्या फेरीच्या आधी वजन, अमली पदार्थ सेवन आदी चाचण्या होतात याचीही माहिती या सर्वांना अर्थातच असणार. असे असतानाही अंतिम फेरीच्या आधी तब्बल दोन किलोंनी विनेशचे वजन वाढू देण्याइतकी बावळट चूक या सर्वांकडून होतेच कशी? या दोन किलोंनी वाढलेल्या वजनातील एक किलो आणि सुमारे ९०० ग्राम तिने रात्रभर घाम गाळून कमी केले. तरीही तिचे वजन कमाल वजनापेक्षा १०० ग्रामने जास्त भरले. साहजिकच अंतिम फेरीसाठी ती अपात्र ठरली. या अत्यंत दुर्दैवी घटनेवर देशभर गदारोळ उडणे साहजिक. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुष्टियोद्धा विजेंदर सिंग म्हणाला : अवघ्या १०० ग्राम वजनवाढीसाठी विनेशला अपात्र ठरवणे अयोग्य आहे.

हीच खरी आपली शोकांतिका. कमाल मर्यादा जर ५० किलोची आहे, त्यात आणखी एक किलोची सवलत मिळत असेल तर स्पर्धकाचे वजन ५१ किलोच्या आत हवेच हवे, हे अध्याहृत आहे. असे असताना ते विहित मर्यादेपेक्षा 'फक्त शंभर ग्राम' जास्त असल्याचा 'गोड मानून' घ्यायला हवे, असे वाटतेच कसे? शास्त्रकाट्याच्या अचूक, नेमक्या कसोटीस सामोरे जाण्याची आपली मानसिकता का नाही? सगळ्यात आपले अनमानधपका धोरण आणि 'होऊन जाईल' ही वृत्ती! या सर्व नियम काट्यांकडे खेळाडूंनी लक्ष ठेवायचे की खेळावर लक्ष केंद्रित करायचे, असा प्रश्न यावर काहींचा असेल. त्याचे उत्तर असे की स्पर्धकांस खेळाकडे लक्ष देता यावे म्हणून तर व्यवस्थापकादी मंडळींचा इतका फौजफाटा त्यांच्या दिमतीला असतो. ते या प्रकरणात काय करत होते? हे सर्व सरकारी अधिकारी. एखादी फाइल इकडून तिकडे हलवणे आणि एखाद्या खेळाडूस उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी नेणे यातील किमान फरक या सर्वांस कळणे अपेक्षित. पण त्यांच्या कृतीवरून तसे म्हणता येत नाही. ''लष्करातील जवानांना ऑलिम्पिकला पाठवा पाच-दहा पदके ते 'यूँ करके' आणतील'', असे विधान आपल्याकडे सर्वोच्च सत्ताधीशच जर करत असतील तर ऑलिम्पिक स्पर्धा, त्यात सर्व गुणांचा लागणारा कस, एका सेकंदाच्या हजारपाचशेव्या सूक्ष्मातिसूक्ष्म कालमापनाची क्षमता आणि त्या कसोटीवर उतरण्यास तयार असलेले देशोदेशींचे स्पर्धक आदींचे गांभीर्य समाजास कसे असणार? अशा दर्जाच्या स्पर्धांमध्ये खिळे लावलेल्या बुटांनी स्पर्धेत धावायचे नसते, सर्दी-खोकल्याची औषधेही या काळात घ्यायची नसतात, धावताना मार्गिका बदलायची नसते इतक्या साध्या पण अत्यंत महत्त्वाच्या नियमांची आणि त्यांचे पालन करण्याच्या गांभीर्याची जाणीव याच समाजातील खेळाडूंना कोण आणि कशी करून देणार?

दुसरे असे की हे सर्व यम-नियम डोळ्यात तेल घालून एरवीही पाळले जायलाच हवेत.

## तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत आंबेडकर हायस्कूलचे यश

मंडणगड :प्रतिनिधी,

येथील मंडणगड तालुका विकास मंडळ ,(१४ २८ )मुंबई, संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड, मधील विद्यार्थ्यांनी, न्यू इंग्लिश स्कूल पालवणी येथे आयोजित करण्यात आलेल्या, तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धांमध्ये सुयश प्राप्त केले आहे. १४ वर्षे वयोगटातून,१) कुमार वेदांत सुर्वे तृतीय क्रमांक २) जितेंद्र मोरे चतुर्थ क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच चौदा वर्ष मुली या गटातून१)कुमारी इंसा फरास हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. सतरा वर्ष वयोगटातून १)कुमार कैवल्य जोशी यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्याचबरोबर२) सुमेध सकपाळ चौथा तर ३)सिफान कोंडेकर याने पाचवा क्रमांक मिळवला आहे.सतरा वर्ष मुली या गटामध्ये १)कुमारी मुग्धा धुमाळे हिने प्रथम क्रमांक मिळवला असून ,२) मिसबाह कुरये ही चौथी आलेली आहे. ङ्क १९ वर्ष मुले या गटात १) कुमार हेमंत जाधव यांन चौथा क्रमांक प्राप्त केला असून २) ऋतिक खरशेकर याने पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे.ङ्क हे सर्व विद्यार्थी जिल्हास्तरावर मंडणगड तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रमेशजी दळवी, संस्थेचे चिटणीस श्री. संतोष मांढरे संस्थेचे सदस्य श्री. राकेश शिंदे तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. विजय खाडे ,उपमुख्याध्यापक श्री. अर्जुन हुल्लोळी , पर्यवेक्षक श्री. शांताराम बैकर यांनी गुलाब पुष्प देऊन यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक श्री. मनोज चव्हाण व श्री. संजय अवेरे यांचेही अभिनंदन केले. ङ्या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका , विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तालुक्यातून या विद्यार्थ्यांवर अभिनंदन यांचा वर्षाव होत आहे.

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शुक्रवार ०९ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## मुंबई गोवा महामार्गावर अपघात सत्र सुरूच....कशेडी घाट येथे झाला अपघात

पोलादपूर : मुंबई-गोवा महामार्गावरल कशेडी घाटातील भोगाव गावचे हद्दीत खचलेल्या रस्त्यावर केमिकल वाहतूक करणारा टँकर पलटी होऊन अपघात झाल्याची घटना गुरुवार रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली आहे. सुदैवाने चालक बचावला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, चालक अंकित राजेश कुमार यादव वय ३० राहणार प्रतापगड राणीगंज उत्तर प्रदेश हा आपल्या ताब्यातील टँकर क्रमांक जी जे १३ बी डब्ल्यू ३५४४ घेऊन लोटे ते दौंड पुणे असा जात असताना कशेडी घाटात भोगाव गाव हद्दीत आला असता महामार्गावरील सुमारे ९० ते १२० फूट लांब व चार फूट खोल खचलेल्या रस्त्यावर रस्त्याचा अंदाज न आल्याने पलटी होऊन महामार्गावर असणाऱ्या मातीच्या ढिगाऱ्यात अडकला आहे. सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखल्याने चालकाला किरकोळ दुखापत वगळता चालक बालबाल बचावला आहे. दरम्यान एकेरी वाहतूक सुरू आहे. सदर टँकरमध्ये वाहनांचे सीट कव्हर बनविणारे फोम केमिकल असल्याने कोणतीही मोठी दुर्घटना टळली आहे



## गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानची महाराष्ट्र राज्य मंत्रालयाच्या मराठी भाषा विभागाकडून "मराठी भाषा युवक मंडळ" म्हणून निवड..

द. रा. जि. प्रतिनिधी:संतोष उध्दरकर.ङ्गङ्गम्हसळा:मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात आणि राज्याबाहेर मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाने जाहीर केला. याबाबतचा अध्यादेश सरकारने नुकताच प्रसिद्ध केला आहे. राज्य मराठी विकास संस्थेतर्फे हा उपक्रम राबवण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात ५०० मंडळे स्थापन करणार आहेत. मराठी भाषेचा प्रसार - प्रचार करण्यासाठी राज्य शासनाचा जेव्हा निर्णय घेण्यात आला ह्यासाठी महाराष्ट्रातील तथा महाराष्ट्राबाहेरील परंतु देशांतर्गत मराठी युवक मंडळे नोंदणीकृत असावीत तसेच ती मंडळे मराठी भाषा संवर्धनासाठी, मराठी अस्मितेसाठी कार्यरत असावी. मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे याबाबतचा मराठी भाषा विभागामार्फत दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेला शासननिर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून मान्यताप्राप्त मराठी भाषा युवक मंडळांतून झालेल्या प्रत्येक पात्र मंडळाला मराठी भाषा विषयक इतर कार्यक्रम आयोजित मुभा देण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत सन २०२४-२५ हि निवड करण्यात आली आहे. मराठीचा प्रचार आणि प्रसार करणे, हे या मंडळांचे मुख्य उद्दिष्ट आहे, त्यांची व्याप्ती महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर पण देशांतर्गत असणार आहे.





ही मंडळे नोंदणीकृत असावीत. मराठीचा प्रचार आणि प्रसार हे युवक मंडळाचे ध्येय असले, तरी मंडळामध्ये अमराठी भाषकांचाही समावेश करता येणार आहे. त्यांची नोंदणी महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्थेने करावी असाही निष्कर्ष काढण्यात आला होता. गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान म्हसळा तर्फे (रायगड) गेली ११ वर्षे मराठी राजभाषा दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो. तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रतिष्ठानचे नेहमी प्रयत्न असतात. गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान तर्फे तिथीनुसार शिवजयंती निमित्त शिवपालखी सोहळा आयोजित करण्यात येतो तसेच दुर्ग दुर्गेश्वर रायगडावरून शिवज्योत आणली जाते, तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा, किल्ले स्पर्धा, सार्वजनिक पुरूष व महिला दहीहंडी उत्सव, दुर्ग अभ्यासवर्ग आयोजन, नामवंत साहित्यिकांचा तसेच इतिहास अभ्यासकांचा सहभाग असलेली व्याख्याने आयोजित करणे, मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि देवनागरी लिपीच्या जतन व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणे, वार्षिक बक्षिस वितरण सोहळा, मराठी राजभाषा दिन असे अनेक सामाजिक समरसता जपणारे उपक्रम राबविले जातात. गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानची हि राज्य शासकीय निवड म्हसळा तालुक्यासाठी खूप अभिमानास्पद असल्याने गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानचे खुप कौतुक केले जात आहे तसेच पुढील काळात मराठी भाषाविषयक प्रशिक्षण कार्यशाळा घेतली जाणार असल्याचे प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष श्री सचिन करडे यांनी माहीती दिली.

## नानामास्तर नगर येथे साई गणेश बिल्डींगमधील कचऱ्याचे साम्राज्य, नगरपरिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष ?

कर्जत,:जयेश जाधव

कर्जत नगरपरिषद व किरवली ग्रामपंचायत यांच्या दोघांच्या सामाईक हद्दीमधील नानामास्तरनगर येथील साई गणेश बिल्डींगमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांनी अध्यक्ष अभिजित राणे यांच्या माहितीवरून व इतर पर्याय उपलब्ध नसल्याने कचरा हा इतरत्र फेकला जातो. त्यांना कोणत्याही प्रकारचे डंपिंग ग्राऊड उपलब्ध नाही. बिल्डींग ही ग्रामपंचायतीमध्ये येत असल्याने तशी व्यवस्था करण्यात येत नाही. तरी या कचऱ्यामुळे नानामास्तर नगर परिसर हा संपूर्णतः प्रदुषीत झालेला आहे. याकडे नगरपरिषदेने लवकरच वेळीच लक्ष देऊन कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार पक्ष)कर्जत शहराध्यक्ष अ‍ॅड .भाऊसाहेब मोरे यांनी एका निवेदनाद्वारे कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.



सदर कचरा हा इतरत्र फेकल्यामुळे रोगराई पसरण्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. ग्रामपंचायत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नाही. त्यामुळे नगरपरिषदेमध्ये असणाऱ्या नागरिकांच्या जिवास प्रदुषणामुळे धोका निर्माण झाला आहे. असेही दिलेल्या लेखी तक्रारीत नमूद केले आहे तरी सदर कचऱ्याची योग्य प्रकारे योग्य फी आकारणी करुन नगरपरिषदेने त्यांना सहकार्य करावे. तसेच नानामास्तर नगर मधील रहिवाशांची काळजी घ्यावी. अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून कर्जत नगरपरिषदेवर आंदोलन करण्यात येईल. तरी दहा दिवसामध्ये उत्तर देण्यात यावे, असे शेवटी तक्रारीत म्हटले आहे दर घटनेची माहिती साई गणेश बिल्डिंगचे अध्यक्ष अभिजीत राणे यांनी आम्हाला दिली आहे आम्ही नगरपालिकेला निवेदन देऊन कर्जत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार )पक्षातर्फे दहा दिवसाच्या आत उत्तर न दिल्यास नाना मास्तर नगरमधील व साई गणेश बिल्डिंग मधील रहिवाशांना घेऊन नगरपरिषदेला जाब विचारून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष अ‍ॅड .भाऊसाहेब मोरे यांनी दिला आहे.

## लाटवण येथे महसूल पंधरवडा अंतर्गत कृषी, पारंपारिक शेती व आधुनिक शेती उद्योग या संदर्भात कार्यक्रम

मंडणगड प्रतिनिधी

महसूल मंडळ मंडनगड अंतर्गत दिनांक ०५/०८/२०२४ रोजी सह्याद्री मोती शेती प्रकल्प लाटवण येथे महसूल पंधरवडा अंतर्गत कृषी, पारंपारिक शेती व आधुनिक शेती उद्योग या संदर्भात कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात दुग्ध व्यवसाय, पशुसंवर्धन, बचत गट -उद्योजकता, सेंद्रिय शेती, खत निर्मिती, शेती पूरक उद्योग तसेच आधुनिक शेती उद्योग मोत्यांची शेती, रेशीम उद्योग, ड्रॅगन फूड शेती इत्यादी बाबत प्रशिक्षण व प्रत्यक्ष क्षेत्रभेट व थेट शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमासाठी मा. तहसीलदार साहेब, मा. साहेब, मा. तालुका कृषी अधिकारी साहेब, पशुसंवर्धन अधिकारी तसेच बँकेच्या अधिकारी, विविध क्षेत्रातील प्रशिक्षक व शेतकरी, सर्व ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, सर्व पोलीस पाटील, बीएलओ, अंगणवाडी सेविका, आणि जास्त संख्येने शेतकरी यांनी उपस्थित उपस्थित होते. सदर कार्यक्रमांमध्ये कृषी विभाग, पंचायत समिती कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, महसूल विभाग तसेच वित्तीय पुरवठा करण्यासाठी शासकीय बँक योजना याविषयी माहिती देण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील यशस्वी शेतकरी यांनी त्यांच्या यशोगाथा सांगितल्या.



## राज्यात एकी, पालीत बेकी ? पाली नगरपंचायत पोटनिवडणुकीत भाजप-शिवसेना (शिंदे गट) आमने-सामने

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

पाली नगरपंचायतीतील रिक्त झालेल्या नगरसेवक पदासाठीपोटनिवडणूक जाहीर झाली असुन या निवडणुकित भाजप विरुद्ध शिवसेना (शिंदे गट) उमेदवार आमनेसामने आहेत. यांच्यात सरळ दुरंगी लढत होत आहे. त्यामुळे राज्यात दुरंगी लढतीची चर्चा सध्या पाली सुरू आहे.

पाली नगरपंचायतच्या पोटनिवडणुकीत आपल्या पक्षाच्या उमेदवारांना अधिकृतपणे एबी फॉर्म देऊन भाजपा व शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही पक्षानी दंड थोपटले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजप शिवसेना (शिंदे गट )आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट ) यांनी एकत्ररित्या खासदार सुनील तटकरे निवडणूकित घेतलेली मेहनत त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकीत सुधागड तालुक्यात झालेला मतदान खासदार सुनील तटकरे हे आघाडीवर होते. ते निवडणूकीत निवडून हि आले. भाजप राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट), शिवसेना( शिंदे गट) या तीन पक्ष महायुतीमुळे आगामी येणा-या विधान सभा, जिल्हा परिषद,पंचायत समिती, निवडणूकीत विजय रथ असेच आगेकुच करत राहणार असे असतानाच पाली नगरपंचायतीच्या वार्ड क्र. १० च्या रिक्त झालेल्या नगरसेवक पदासाठी पोटनिवडणूक जाहीर झाले. आणि भाजप व शिवसेना (शिंदे गट)हे मित्र पक्ष असणारे आज हे दोन हि पक्ष एकमेकांच्या समोर निवडणूकीच्या मैदानात उभे राहिले आहेत. केंद्र व राज्यात एकत्रित सत्तेत असतानाही भाजप व शिवसेना (शिंदे गट) यांनी मात्र नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी एकमेकांविरोधात लढण्याची तयारी केली आहे. भाजप व शिवसेनेमध्येच दुरंगी लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुरंगी लढत झाल्यास त्याचा कोणाला फटका बसेल अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. शिवाय स्थानिक पातळीवर वेगळी गणिते जमताना दिसत आहेत. ङ्गङ्गराष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट ) भूमिकेवर लक्ष ङ्ग या प्रभागात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेविका निवडून आल्या होत्या आणि त्याच नगराध्यक्ष झाल्या होत्या. त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर राजीनामा दिला आणि ही जागा रिक्त झाली आहे. परिणामी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा या उमेदवारी वरती दावा असताना सुद्धा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार गट किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गट यापैकी कोणीही निवडणुक लढण्याचा निर्णय घेतलेला नाही. असे असताना निवडणुकीमध्ये कोणाला पाठिंबा देणार या बाबत मात्र दोन्ही पक्षांची भूमिका अजून स्पष्ट नाही. ते नक्की या पोट निवडणूकीत पाठींबा कोणाला देणार अशी चर्चा जोर धरत आहे,ङ्गङ्गपाठींबा कोणाला ङ्ग नुकताच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये शिवसेना (शिंदे गट ) व आणि भाजप या दोन पक्षानी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट ) पक्ष खांद्याला खांद्या लावून काम केले असल्याने पाली नगरपंचायती पोट निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित (पवार गट ) पक्ष कोणाला कोणाला पाठिंबा देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे




मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई - ४०००८१- अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )